वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, महाराष्ट्र राज्य, पुणे प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना - पाणलोट विकास घटक २.०, राज्यस्तरीय नोडल यंत्रणेची ९ वी बैठक दि. २८.१२.२०२३ रोजी संपन्न झाली.

सदर बैठकीस खालील अधिकारी व सदस्य उपस्थित होते.

- श्री. सुनील चव्हाण (भा. प्र.से.), सचिव, मृद व जलसंधारण, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई,
- श्री. वि. बा. नाथ, मुख्य कार्यकारी अधिकारी, वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा २.०, पुणे तथा महासंचालक, वाल्मी, छत्रपती संभाजीनगर,
- श्री. अजय गुल्हाने, आयुक्त, मनरेगा, नागपूर यांचे प्रतिनिधी (व्ही.सी. द्वारे),
- अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे प्रतिनिधी (व्ही.सी. द्वारे),
- प्रधान सचिव, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे प्रतिनिधी (व्ही.सी. द्वारे),
- श्री. युवराज अजेटराव, उपसचिव, मृद व जलसंधारण विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई,
- श्रीम. शुभांगी पोटे, अवर सचिव, मृद व जलसंधारण विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई,
- श्री. रविंद्र भोसले, अपर मुख्य कार्यकारी अधिकारी, वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा २.०, पुणे,
- श्री. ऋषि राज गोसकी, संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे यांचे प्रतिनिधी (व्ही.सी. द्वारे),
- आयुक्त (कामगार), कामगार विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे प्रतिनिधी (व्ही. सी. द्वारे),
- आयुक्त, पशुसंवर्धन यांचे प्रतिनिधी (व्ही. सी. द्वारे),
- श्री. ॲड. अमित गीते, अध्यक्ष, श्री एकलव्य सेवाभावी संस्था, परभणी,
- श्री. यशवंत पांडे, सचिव, अश्वमेघ ग्रामीण पाणलोट क्षेत्र विकास व शैक्षणिक संस्था, फत्तेपूर.

| अ.क्र. | विषय | बैठकीतील चर्चा | बैठकीतील निर्णय | अंमलबजावणी यंत्रणा / अधिकारी | अंमलबजावणी पूर्ण करणेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | राज्यस्तरीय नोडल यंत्रणेच्या (SLNA) दि. १६.१०. २०२३ रोजीच्या आठव्या बैठकीचे इतिवृत्तास मान्यता देणे. | राज्यस्तरीय नोडल यंत्रणेच्या दि. १६.१०. २०२३ रोजीच्या आठव्या बैठकीचे इतिवृत्ताचे व सदर बैठकीत झालेल्या निर्णयावर केलेल्या अथवा कार्यवाहीत असलेल्या बाबी समितीस अवगत करून देण्यात आल्या. | बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार NRM & Governance Plan या घटकांअतर्गत पाणीपातळी मोजणेसाठी खरेदी करवयाच्या Water Level Sounder बद्दल तांत्रिक माहिती घेतली असता सदर उपकरणाचे नाव Water Level Sounder / Indicator असे वाचावे. तसेच पर्जन्यमापक यंत्र कृषी विभागामार्फत मंडळ स्तरावर बसविण्यात आले असल्याने या योजनेतून पर्जन्यमापक यंत्र खरेदी करु नये, अशा बदलासह इतिवृत्तास मान्यता देण्यात आली. | वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा २.०, पुणे. | |
| २ | राज्यस्तरीय तांत्रिक समितीच्या (SLTC) बैठकीत मान्यता मिळालेल्या सविस्तर प्रकल्प अहवालांना (DPR) मान्यता प्रदान करणे. | राज्यस्तरीय तांत्रिक समितीच्या (SLTC) दि. ३०.११.२०२३ रोजी पार पाडलेल्या ८ व्या बैठकीत ७ सविस्तर प्रकल्प अहवालांना (DPR) राज्यस्तरीय तांत्रिक समितीने मान्यता दिली व राज्यस्तरीय मान्यता समितीस सादर करण्यासाठी शिफारस करण्याबाबत चर्चा करण्यात आली. सदरच्या सविस्तर प्रकल्प अहवालांना मान्यता देणेस्तव चर्चा झाली. | राज्यस्तरीय तांत्रिक समितीच्या ८ व्या बैठकीत ७ शिफारस केलेल्या सविस्तर प्रकल्प अहवालांना (DPR) परिशिष्ट “अ” मधील तपशीलाप्रमाणे मान्यता देण्यात आली.<br>रायगड, पालघर, बुलढाणा, चंद्रपूर या जिल्ह्यातील सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) मोठ्या संख्येने अपूर्ण आहेत ते तातडीने संबंधित जिल्हा जलसंधारण अधिकारी यांनी पूर्ण करून घेऊन जिल्हा पाणलोट कक्ष तथा माहिती केंद्र (WCDC) यांची मान्यता घेऊन राज्यस्तरीय तांत्रिक समितीच्या (SLTC) मान्यतेसाठी सादर करणेबाबतच्या सूचना अध्यक्षांनी दिल्या. | प्रकल्प व्यवस्थापक तथा जिल्हा जलसंधारण अधिकारी व प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणा. | १५ दिवस |

| अ.क्र. | विषय | बैठकीतील चर्चा | बैठकीतील निर्णय | अंमलबजावणी यंत्रणा / अधिकारी | अंमलबजावणी पूर्ण करणेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| ३ | प्रधान मंत्री कृषी सिंचन योजना - पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत उत्पादन पद्धती या घटकाच्या अंमलबजावणीसाठी जिल्हा प्रकल्प संचालक, आत्मा यांना वितरीत करण्यात आलेला निधी रु.२५ कोटी यास राज्यस्तरीय नोडल यंत्रणा बैठकीत कार्योत्तर मान्यता मिळणेबाबत. | संचालक, आत्मा, कृषी आयुक्तालय यांनी उत्पादन पद्धती घटकाच्या अंमलबजावणीसाठी दि. १६.११.२०२३ चे पत्रान्वये जिल्हा निहाय निधीची मागणी केली होती. योजनेत समाविष्ट जिल्ह्यासाठी एकूण रु. ६५३१.७१ लाख एवढ्या निधीची मागणी संचालक, आत्मा यांनी केली होती. संचालक, आत्मा यांच्याकडून प्राप्त निधी मागणी रु. ६५३१.७१ लाख ऐवजी उपलब्ध निधीचा विचार करता रु. २५००.०० लाख एवढा निधी संचालक, आत्मा यांना वितरीत करण्यासाठी मान्यता देण्यासाठी शासनास विनंती करण्यात आली होती. त्यानुसार शासनाने दि. २१.११.२०२३ च्या पत्राद्वारे हा निधी वितरीत करण्यास मान्यता दिली आहे. त्यानुसार संचालक, आत्मा यांच्याकडून प्राप्त जिल्ह्यानिहाय निधी मागणी आणि शासनाकडून निधी वितरणास प्राप्त झालेली मान्यता या आधारे एकूण रु. २५ कोटी एवढा निधी प्रकल्प संचालक, आत्मा यांच्या फिरत्या निधी खात्यावर जिल्हा पाणलोट कक्ष तथा माहिती केंद्र यांच्या मार्फत PFMS प्रणालीद्वारे दि.२४/११/२०२३ च्या वसुंधरा कार्यालयाच्या निधी वितरण आदेशाद्वारे वर्ग करण्यात आला असल्याचे समितीस अवगत करण्यात आले. त्यासाठी वसुंधरा कार्यालय | प्रधान मंत्री कृषी सिंचन योजना - पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत उत्पादन पद्धती या घटकाच्या अंमलबजावणीसाठी जिल्हा प्रकल्प संचालक, आत्मा यांना वितरीत करण्यात आलेला निधी रु. २५ कोटी यांस कार्योत्तर मान्यता देण्यात आली. | वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा २.०, पुणे, आत्मा यंत्रणा, प्रकल्प व्यवस्थापक तथा जिल्हा जलसंधारण अधिकारी व प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणा. | |

| अ.क्र. | विषय | बैठकीतील चर्चा | बैठकीतील निर्णय | अंमलबजावणी यंत्रणा / अधिकारी | अंमलबजावणी पूर्ण करणेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| | | स्तरावरून जिल्हा पाणलोट कक्ष तथा माहिती केंद्र यांना Drawing Limit जिल्हा निहाय निश्चित करून देऊन त्यांच्यामार्फत प्रकल्प संचालक, आत्मा यांच्या फिरत्या निधी खात्यावर निधी वर्ग करण्यात आला याबाबत समितीस माहिती देण्यात आली. | | | |
| ४ | प्रधान मंत्री कृषी सिंचन योजना - पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत उपजीविका या घटकाच्या अंमलबजावणीसाठी महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान यांच्याकडे वर्ग करण्यात आलेला निधी रु. ५५ कोटी यास राज्यस्तरीय नोडल यंत्रणा बैठकीत कार्योत्तर मान्यता मिळणेबाबत. | दि. ३१.१०.२०२३ च्या महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनन्नोती अभियान (MSRLM) यांच्या पत्रानुसार प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना - पाणलोट विकास घटक (PMKSY-WDC २.०) अंतर्गत उपजीविका उपक्रमासाठी Grant-in- aid या शीर्षकाखाली उपलब्ध असलेल्या निधी अन्वये PMKSY-WDC २.० अंतर्गत राज्यातील प्रकल्प क्षेत्रात कार्यरत सरासरी १६,००० महिला स्वयंसहाय्यता समुह असून त्यापैकी १५७५ महिला स्वयंसहाय्यता समुह यांना उपजीविका निधी वितरीत करण्यासाठी रु.६३ कोटी एवढ्या निधीची मागणी केली होती. हा निधी पात्र गटांना प्रत्येकी ४ लाखाच्या मर्यादेत देण्याबाबत प्रस्तावित केले होते. याबाबत समितीस माहिती देण्यात आली.<br>केंद्र शासनाच्या पत्र क्र.Z११०११/१३/२०१९ -PPC-(Part२ E- ३०१२७५५) दि.२६ /०९ /२०२३ अन्वये प्राप्त उपजीविका घटकाच्या मार्गदर्शक सूचनामध्ये मुद्दा क्र. ५.१.५ मध्ये नमूद केल्यानुसार | महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनन्नोती अभियान (MSRLM) अंतर्गत कार्यरत महिला स्वयंसहाय्यता समुह यांना प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना - पाणलोट विकास घटक (PMKSY-WDC २.०) अंतर्गत उपजीविका घटकांतर्गत उपजीविका उपक्रमासाठी वितरीत करण्यात आलेला निधी रु. ५५ कोटी यास कार्योत्तर मान्यता देण्यात आली. | वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा २.०, पुणे, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनन्नोती अभियान (MSRLM) यंत्रणा, प्रकल्प व्यवस्थापक तथा जिल्हा जलसंधारण अधिकारी व प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणा. | |

| अ.क्र. | विषय | बैठकीतील चर्चा | बैठकीतील निर्णय | अंमलबजावणी यंत्रणा / अधिकारी | अंमलबजावणी पूर्ण करणेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| | | स्वयंसहाय्यता समूहांना उपजीविका उपक्रमासाठी रु. ४ लाखाच्या मर्यादेत निधी देता येऊ शकेल. त्यानुसार महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनन्नोती अभियान (MSRLM) यांच्या मागणीनुसार प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना - पाणलोट विकास घटक (PMKSY-WDC २.०) अंतर्गत उपजीविका उपक्रमासाठी Grant-in-aid या शीर्षकाखाली उपलब्ध असलेल्या निधी अन्वये PMKSY-WDC २.० अंतर्गत राज्यातील प्रकल्प क्षेत्रात कार्यरत १५७५ महिला स्वयंसहाय्यता समुह यांना उपजीविका उपक्रमासाठी निधी वितरीत करण्यासाठी रु. ६३ कोटी एवढा निधी वर्ग करणेसाठी वसुंधरा कार्यालयाचे दि.०९.११.२०२३ पत्रान्वये शासनास मान्यता देणेसाठी विनंती करण्यात आली होती. त्यानुसार शासन पत्र दि.२१.११.२०२३ अन्वये रु. ६३ कोटी एवढा निधी महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनन्नोती अभियान (MSRLM) यांचेकडे वर्ग करण्यास शासनाने मान्यता दिली आहे. वसुंधरा स्तरावर उपलब्ध निधीचा विचार करता सद्य:स्थितीत रु. ५५ कोटी एवढा निधी महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनन्नोती अभियान (MSRLM) यांना वसुंधरा कार्यालयाच्या दि. २४.११.२०२३ च्या निधी वितरण आदेशाद्वारे | | | |

| अ.क्र. | विषय | बैठकीतील चर्चा | बैठकीतील निर्णय | अंमलबजावणी यंत्रणा / अधिकारी | अंमलबजावणी पूर्ण करणेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| | | वितरीत करण्यात आला. याबाबत समितीस अवगत करण्यात आले. | | | |
| ५ | प्रधान मंत्री कृषी सिंचन योजना - पाणलोट विकास घटक २.० मधील क्षमता बांधणी घटकांतर्गत जिल्हा प्रशिक्षण संस्था (DRO), प्रकल्प प्रशिक्षण संस्था (PTO) , उपजीविका प्रशिक्षण संस्था (LRA) यासाठी निवडसूची तयार करण्यास्तव स्वयंसेवी संस्था/ अशासकीय संस्था यांच्या प्राप्त प्रस्तावांची छाननी करून वाल्मी संस्थेने सादर केलेल्या गुणांकन यादीवर पुढील कार्यवाही करणेबाबत. | वसुंधरा कार्यालयात सादर झालेले प्रस्ताव व त्यानुसार ज्या संस्थांनी धनादेश सादर केले आहेत. त्यामध्ये जिल्हा संसाधन संस्था (DRO) चे २३२ प्रस्ताव, प्रकल्प प्रशिक्षण संस्था (PTO) चे ४८९ प्रस्ताव, उपजीविका संसाधन यंत्रणा (LRA) चे ३९५ प्रस्ताव ग्राह्य धरण्यात यावे व त्यानुसार जल व भूमी व्यवस्थापन संस्थेने संस्थांचे गुणांकन केल्यानुसार कार्यवाही करण्यात यावी. याबाबत बैठकीत चर्चा करण्यात आली. | एकात्मिक पाणलोट विकास कार्यक्रमांतर्गत संस्थांची निवड आणि निवड सूची तयार करण्यासाठी जी कार्यपद्धती अवलंबण्यात आली होती. त्यात वृत्तपत्रात जाहिरातीद्वारे जिल्हा स्तरावर स्वयंसेवी संस्थांचे प्रस्ताव मागविण्यात येऊन तेथे या प्रस्तावांची छाननी केली जात असे. त्यानंतर विभागीय स्तरावर विभागीय कृषी सह संचालक यांना जिल्ह्यांकडून पात्र व अपात्र संस्थांची यादी गुणांकनासहित पाठवली जात असे. विभाग स्तरावर पुन्हा एकदा जिल्ह्यांनी पाठविलेल्या माहितीच्या अनुषंगाने छाननी करुन संस्थांच्या गुणांकनांची यादी वसुंधरा कार्यालयाकडे पाठविली जात असे. त्यानंतर राज्यस्तरीय नोडल यंत्रणेच्या बैठकीत विभाग स्तरावरुन संस्थांच्या प्राप्त गुणांकनाच्या नुसार ज्या संस्थांना १०० पैकी ५० किंवा ५० पेक्षा जास्त गुण प्राप्त झाले आहेत त्या सर्व संस्थांची निवड सूची तयार करण्यात आली. यात संस्थांच्या गुणांकनांची उतरत्या क्रमानुसार यादी तयार करण्यात आली. जिल्ह्यांना प्रशिक्षणार्थी संख्येनुसार आवश्यक संस्थांची संख्या निश्चिती | वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा २.०, पुणे व वाल्मी संस्था | |

| अ.क्र. | विषय | बैठकीतील चर्चा | बैठकीतील निर्णय | अंमलबजावणी यंत्रणा / अधिकारी | अंमलबजावणी पूर्ण करणेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| | | | करण्यात येऊन तयार करण्यात आलेल्या निवड सूचीनुसार संस्थांची निवड करण्यात आली.<br>• प्रधान मंत्री कृषी सिंचन योजना - पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत देखील वाल्मी संस्थेकडून जिल्हा संसाधन संस्था (DRO), प्रकल्प प्रशिक्षण संस्था (PTO), उपजीविका संसाधन यंत्रणा (LRA) यांच्या प्रस्तावांची छाननी करुन जी गुणांकन यादी तयार करण्यात आली आहे त्यानुसार ज्या संस्थांना ५० किंवा ५० पेक्षा जास्त गुण प्राप्त झाले आहेत त्या सर्व संस्थांची प्राप्त गुणांकनांच्या उतरत्या क्रमानुसार निवड सूची तयार करण्यात यावी.<br>जिल्हा संसाधन संस्था स्तरावरील, प्रकल्प प्रशिक्षण संस्था स्तरावरील, उपजीविका संसाधन संस्था स्तरावरील प्रशिक्षणार्थी संख्या वाल्मी मार्फत निश्चित करण्यात यावी आणि मग त्यानुसार संस्थांची संख्या निश्चित करण्यात येऊन उपरोक्त नमुद केल्याप्रमाणे जी निवड सूची तयार करण्यात येईल त्यामधून गुणांकनांनुसार संस्थांची निवड करण्यात येईल. निवड करण्यात आलेल्या संस्थांमधून एखाद्या संस्थेने काम करण्यास इच्छुक नसल्याचे कळविल्यास निवड सूचीतील क्रमवार गुणांकनांनुसार पुढील संस्थेची निवड करण्यात यावी. भविष्यात निवड करण्यात | | |

| अ.क्र. | विषय | बैठकीतील चर्चा | बैठकीतील निर्णय | अंमलबजावणी यंत्रणा / अधिकारी | अंमलबजावणी पूर्ण करणेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| | | | आलेल्या संस्थांपैकी ज्या संस्थांचे काम असमाधानकारक आहे, असे वाल्मी संस्थेकडून कळविण्यात आले तर अशा संस्थांचा काळ्या यादीत समावेश करून त्यांचे काम निवड सूचीतील गुणांकनानुसार क्रमवार पात्र संस्थेस देण्यात यावे, असे निर्देश समितीने दिले. | | |
| ६ | प्रधान मंत्री कृषी सिंचन योजना - पाणलोट विकास घटक २.० मधील क्षमता बांधणी घटकांतर्गत जिल्हा प्रशिक्षण संस्था (DRO), प्रकल्प प्रशिक्षण संस्था (PTO) , उपजीविका प्रशिक्षण संस्था (LRA) या क्षेत्रीय स्तरावरील प्रशिक्षण संस्थांचे दर निश्चित करणेबाबत. | जिल्हा संसाधन संस्था (DRO) या जिल्हा स्तरावर कार्यरत राहतील. या संस्थामार्फत प्रकल्प प्रशिक्षण संस्था (PTO) व उपजीविका संसाधन यंत्रणा (LRA) यांचे प्रविण प्रशिक्षकांची प्रशिक्षणे आयोजित करण्यात येतील. ही होणारी प्रशिक्षणे निवासी स्वरुपाची असतील.<br>प्रकल्प प्रशिक्षण संस्था (PTO) या प्रकल्प स्तरावर कार्यरत असतील व या संस्थांमार्फत प्रकल्प क्षेत्रातील विविध भागधारकांची या योजनेच्या अनुषंगाने विविध विषयावरील प्रशिक्षणे आयोजित करण्यात येतील. ही होणारी प्रशिक्षणे अनिवासी स्वरुपाची असतील. उपजीविका प्रशिक्षण संस्था (LRA) या संस्थामार्फत योजनेतील उपजीविका घटकाअंतर्गत प्रकल्प क्षेत्रातील लाभार्थ्यांची प्रशिक्षणे आयोजित करण्यात येतील. ही होणारी प्रशिक्षणे अनिवासी स्वरुपाची असतील.<br>जिल्हा संसाधन संस्था (DRO), प्रकल्प प्रशिक्षण संस्था (PTO) , उपजीविका संसाधन | केंद्र व राज्य शासनाच्या इतर योजना उदा. जल जीवन मिशन, सर्व शिक्षा अभियान, आत्मा, कृषी विभागाच्या योजनांचे प्रशिक्षण दर, स्वच्छ भारत मिशन इ. योजनांमध्ये प्रशिक्षणाचे किती दर आहेत याची माहिती घेऊन त्याचा तुलनात्मक तक्ता तयार करून पुढील राज्यस्तरीय नोडल यंत्रणेच्या बैठकीत सादर करण्यात यावा. जेणे करून जिल्हा प्रशिक्षण संस्था (DRO), प्रकल्प प्रशिक्षण संस्था (PTO) , उपजीविका प्रशिक्षण यंत्रणा (LRA) या संस्थांचे प्रशिक्षणाचे दर निश्चित करता येतील असा निर्णय समितीने घेतला. | वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा २.०, पुणे, वाल्मी संस्था. | |

| अ.क्र. | विषय | बैठकीतील चर्चा | बैठकीतील निर्णय | अंमलबजावणी यंत्रणा / अधिकारी | अंमलबजावणी पूर्ण करणेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| | | यंत्रणा (LRA) या प्रत्येक स्तरावर या प्रकल्पातील प्रशिक्षणार्थी संख्या त्या प्रकल्पात क्षमता बांधणीसाठी निधीच्या मर्यादेत निश्चित करणे आवश्यक असल्याबाबत चर्चा झाली. प्रधान मंत्री कृषी सिंचन योजना - पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत जल व भूमी व्यवस्थापन संस्था (वाल्मी), औरंगाबाद ही संस्था राज्य प्रशिक्षण संस्था म्हणून कार्यरत असून या संस्थेने जिल्हा संसाधन संस्था (DRO), प्रकल्प प्रशिक्षण संस्था (PTO), उपजीविका संसाधन यंत्रणा (LRA) या संस्थांमार्फत आयोजित करण्यात येणाऱ्या प्रशिक्षणासाठी दर निश्चित करून देण्याबाबत वसुंधरा कार्यालयामार्फत कळविण्यात आले होते. त्यानुसार वाल्मी संस्थेने प्रशिक्षणाचे जे दर निश्चित करून वसुंधरा कार्यालयास कळविले होते ते बैठकीत सादर करण्यात आले. याबाबत निर्णय घेणेबाबत चर्चा करण्यात आली. वाल्मी संस्थेने निश्चित करून दिलेले दर कमी असून केंद्र व राज्य शासनाच्या इतर योजनेतल्यापेक्षा अधिक दर असल्याचे समितीतील स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी श्री. पांडे व श्री. गीते यांनी सांगितले. केंद्र व राज्य शासनाच्या इतर योजनेतील प्रशिक्षणासाठी असलेला दर यांचा अभ्यास करून त्यानुसार दर निश्चित करण्याची त्यांनी मागणी केली. केंद्र व | | | |

| अ.क्र. | विषय | बैठकीतील चर्चा | बैठकीतील निर्णय | अंमलबजावणी यंत्रणा / अधिकारी | अंमलबजावणी पूर्ण करणेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| | | राज्य शासनाच्या इतर योजना उदा. जल जीवन मिशन, सर्व शिक्षा अभियान, आत्मा, कृषी विभागाच्या योजनांचे प्रशिक्षण दर, स्वच्छ भारत मिशन इ. योजनांमध्ये प्रशिक्षणाचे किती दर आहेत याची माहिती घेऊन त्याचा तुलनात्मक तक्ता तयार करून पुढील राज्य स्तरीय नोडल यंत्रणेच्या बैठकीत सादर करण्यात यावा. जेणे करून जिल्हा संसाधन संस्था (DRO), प्रकल्प प्रशिक्षण संस्था (PTO) , उपजीविका संसाधन संस्था (LRA) या संस्थांचे प्रशिक्षणाचे दर निश्चित करता येतील अशा सूचना अध्यक्षांनी दिल्या. | | | |
| ७ | प्रधान मंत्री कृषी सिंचन योजना - पाणलोट विकास घटक २.० मधील क्षमता बांधणी घटकांतर्गत प्रशिक्षणाचे दरात वाढ करणेबाबत. | प्रधान मंत्री कृषी सिंचन योजना - पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत जल व भूमी व्यवस्थापन संस्था (वाल्मी), औरंगाबाद ही संस्था राज्य प्रशिक्षण संस्था म्हणून कार्यरत असून वसुंधरा कार्यालय व वाल्मी संस्था यांच्यात झालेल्या MOU नुसार वाल्मी स्तरावर आयोजित प्रशिक्षणासाठी रु. २०००/- प्रति दिन प्रति प्रशिक्षणार्थी दर निश्चित करण्यात आला आहे. महासंचालक, वाल्मी यांनी दि. १९.१०.२०२३ च्या पत्रान्वये वाल्मी संस्थेच्या नियामक मंडळाच्या ७४ व्या बैठकीत संस्थेच्या प्रशिक्षणाचे दरात वाढ करून रु. २५००/- प्रति प्रशिक्षणार्थी प्रति दिवस या दरास मान्यता प्रदान करण्यात आली असून | प्रधान मंत्री कृषि सिंचन योजना - पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत राज्य प्रशिक्षण संस्था म्हणून कार्यरत जल व भूमी व्यवस्थापन संस्था (वाल्मी) संस्थेच्या वाल्मी स्तरावर आयोजित प्रशिक्षणासाठी प्रशिक्षणाचे दर रु. २०००/- प्रति दिन प्रति प्रशिक्षणार्थी निश्चित करण्यात आला होता. त्यात वाढ करून तो रु. २५००/- प्रति प्रशिक्षणार्थी प्रति दिवस करण्यास मान्यता प्रदान करण्यात आली. त्यानुसार प्रधान मंत्री कृषी सिंचन योजना - पाणलोट विकास घटक २.० मधील क्षमता बांधणी घटकांतर्गत वाल्मी स्तरावर आयोजित प्रशिक्षणाच्या दरात रु. २५००/- प्रति प्रशिक्षणार्थी प्रति दिवस या दरास दि.०३ मे, २०२३ | वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा २.०, पुणे | |

| अ.क्र. | विषय | बैठकीतील चर्चा | बैठकीतील निर्णय | अंमलबजावणी यंत्रणा / अधिकारी | अंमलबजावणी पूर्ण करणेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| | | त्यानुसार प्रधान मंत्री कृषी सिंचन योजना - पाणलोट विकास घटक २.० मधील क्षमता बांधणी अंतर्गत प्रशिक्षणाच्या दरात देखील वाढ करण्यात यावी, असे कळविले असल्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस सांगितले. प्रधान मंत्री कृषी सिंचन योजना - पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत जल व भूमी व्यवस्थापन संस्था (वाल्मी), औरंगाबाद ही संस्था राज्य प्रशिक्षण संस्था म्हणून कार्यरत असून दि.०३.०५.२०२३ पासून या दरास मान्यता मिळावी, असे वाल्मी संस्थेने कळविले असल्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी, वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा २.० यांनी समितीस सांगितले. त्यानुसार वाल्मी स्तरावर आयोजित प्रशिक्षणासाठी रु. २५००/- प्रति प्रशिक्षणार्थी प्रति दिवस या दरास मान्यता देण्याबाबत चर्चा झाली व यास समितीने संमती दिली. वाल्मीमध्ये प्रशिक्षणार्थीसाठी निवास व भोजनाची उत्तम व्यवस्था करण्यात यावी, शिवाय वाल्मी स्तरावर वसतिगृहाच्या काही खोल्यामध्ये यशदाच्या धर्तीवर पंचतारांकित निवासी व्यवस्था करण्यात यावी, अशी सूचना अध्यक्षांनी महासंचालक, वाल्मी यांना केली. | पासून लागू करण्यास मान्यता देण्याचा निर्णय समितीने घेतला. | | |

| अ.क्र. | विषय | बैठकीतील चर्चा | बैठकीतील निर्णय | अंमलबजावणी यंत्रणा / अधिकारी | अंमलबजावणी पूर्ण करणेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| ८ | प्रधान मंत्री कृषी सिंचन योजना - पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत प्रेरक प्रवेश उपक्रम व उत्पादन पद्धती या घटकाच्या अंमलबजावणीसाठी आत्मा यंत्रणेस प्रशासकीय खर्चासाठी निधी वितरीत करण्याबाबत. | कृषी संचालक, आत्मा यांनी प्रधान मंत्री कृषी सिंचन योजना - पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत प्रेरक प्रवेश उपक्रम व उत्पादन पद्धती या घटकाच्या अंमलबजावणीसाठी प्रशासकीय खर्चाची मागणी केली आहे. प्रधान मंत्री कृषी सिंचन योजना - पाणलोट विकास घटक २.० मध्ये प्रेरक प्रवेश उपक्रम यासाठी रु.२६७१.१२ लाख एवढा निधी मंजूर करण्यात आला असून व उत्पादन पद्धती हा घटक राबविण्यासाठी रु.६५३१.७१ लाख एवढ्या निधीची मागणी संचालक, आत्मा यांच्याकडून करण्यात आली होती, त्याऐवजी रु. २५ कोटी एवढा निधी त्यांना वर्ग करण्यात आला आहे. प्रेरक प्रवेश उपक्रम साठीचा निधी रु. २६७१.१२ लाख व उत्पादन पद्धतीचा मागणी करण्यात आलेला निधी रु.६५३१.७१ लाख असा एकत्रित निधी रक्कम रु. ९२०२.८३ लाख इतका होतो, या निधीच्या १० टक्के प्रमाणे होणारी रक्कम रु. ९२०.२८ लाख एवढ्या निधीची प्रशासकीय खर्चासाठी मागणी कृषी संचालक, आत्मा यांनी केली आहे. प्रेरक प्रवेश उपक्रम व उत्पादन पद्धती या घटकाच्या अंमलबजावणीसाठी सेवा पुरवठादार संस्था नेमणे प्रस्तावित असून त्या अनुषंगाने सदरचा रु.९२०.२८ लाख एवढा निधी प्रशासकीय | प्रधान मंत्री कृषी सिंचन योजना - पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनानुसार प्रशासकीय खर्चाची तरतूद एकूण प्रकल्प मूल्याच्या खर्चाच्या १० टक्केच्या मर्यादेत असल्याबाबत नमूद करण्यात आले आहे, या बाबीच्या अनुषंगाने प्रधान मंत्री कृषी सिंचन योजना - पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत प्रवेश प्रेरक व उत्पादन पद्धती याबाबीकरिता अंदाजे २०० कोटी इतका निधी आत्मा संस्थेस वितरीत करण्यात येणार आहे. सद्य:स्थितीत दोन वर्षाचा प्रकल्प कालावधी शिल्लक आहे. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार आत्मा संस्थेस वितरीत करावयाच्या निधीवर १०% प्रशासकीय शुल्क म्हणजेच रक्कम रु. २० कोटी अनुज्ञेय आहेत. तसेच प्रधान मंत्री कृषी सिंचन योजना - पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत पाणलोट विकास पथकातील सदस्य (WDT) कृषि हे आत्मा संस्थेस वितरीत केलेल्या निधीस अनुसरुन उत्पादन पद्धती, प्रवेश प्रेरक उपक्रम विषयक सर्व कामकाज करणार असल्याने एकूण १४० WDT चे मानधन रक्कम २७९००*१४०*२४ महिने =९३७.४४ लाख म्हणजेच दोन वर्षा करिता अंदाजे १० कोटी | वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा २.०, पुणे व आत्मा संस्था | |

| अ.क्र. | विषय | बैठकीतील चर्चा | बैठकीतील निर्णय | अंमलबजावणी यंत्रणा / अधिकारी | अंमलबजावणी पूर्ण करणेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| | | खर्चासाठी उपलब्ध करून देणेबाबत संचालक, आत्मा यांनी वसुंधरा कार्यालयास कळविले आहे. सदर निधी वितरीत करताना जिल्हानिहाय एकूण मागणीच्या ५० टक्के निधी राज्यस्तरावर व उर्वरित ५० टक्के निधी जिल्हा स्तरावर उपलब्ध करून देणेत यावा, असे कृषी संचालक, आत्मा यांनी वसुंधरा कार्यालयास कळविले असून याबाबत समिती सदस्यांना अवगत करून देण्यात आले. त्याबाबत बैठकीत चर्चा करण्यात आली.<br>प्रधान मंत्री कृषी सिंचन योजना - पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत प्रवेश प्रेरक व उत्पादन पद्धती याबाबीकरीता अंदाजे २०० कोटी इतका निधी आत्मा संस्थेस वितरीत करण्यात येणार आहे. सद्य:स्थितीत दोन वर्षाचा प्रकल्प कालावधी शिल्लक आहे. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार आत्मा संस्थेस वितरीत करावयाच्या निधीवर १०% प्रशासकीय शुल्क म्हणजेच रक्कम रु. २० कोटी अनुज्ञेय आहेत. तथापि प्र.मं.कृ.सिं.यो.पा.वि.घ.२.० अंतर्गत पाणलोट विकास पथकातील सदस्य (WDT) कृषि हे आत्मा संस्थेस वितरीत केलेल्या निधीस अनुसरुन उत्पादन पद्धती, प्रवेश प्रेरक उपक्रम विषयक सर्व कामकाज करणार असल्याने एकूण १४० WDT चे मानधन रक्कम २७९००*१४०*२४ | इतका निधी अनुज्ञेय प्रशासकीय निधीतून समायोजित करण्याबाबत निर्देश देण्यात आले.<br>त्यास अनुसरुन अनुज्ञेय अंदाजे प्रशासकीय निधी रक्कम रु. २० कोटी मधून उपरोक्त WDT मानधन रक्कम रु. १० कोटी वजा जाता उर्वरित रक्कम रु. १० कोटी म्हणजेच आत्मा संस्थेस वितरीत करावयाच्या निधीच्या ५% प्रमाणे प्रशासकीय निधी वितरीत करण्यास मान्यता देण्यात आली.<br>सद्य:स्थितीत आत्मा संस्थेस उत्पादन पद्धती या बाबीकरिता २५ कोटी व प्रवेश प्रेरक उपक्रम या बाबीकरिता २६.७१ कोटी असा एकूण ५१.७१ कोटी इतका निधी वितरीत केलेला आहे. सदर वितरीत केलेल्या निधीच्या ५% म्हणजेच २.५ कोटी इतका निधी आत्मा संस्थेस प्रशासकीय निधी म्हणून तात्काळ वितरीत करणेबाबत निर्देश देण्यात आले.<br>तसेच उर्वरित प्रशासकीय निधी जसजसे आत्मा संस्थेस सदर बाबीकरीता निधी वितरीत करण्यात येईल, तसतसे वितरीत निधीच्या ५% प्रशासकीय निधी वितरीत करण्याबाबत निर्देश देण्यात आले. | | |

| अ.क्र. | विषय | बैठकीतील चर्चा | बैठकीतील निर्णय | अंमलबजावणी यंत्रणा / अधिकारी | अंमलबजावणी पूर्ण करणेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| | | महिने = ९३७.४४ लाख म्हणजेच दोन वर्षाकरिता अंदाजे १० कोटी इतका निधी आवश्यक आहे.<br>अनुज्ञेय अंदाजे प्रशासकीय निधी रक्कम रु. २० कोटी मधून उपरोक्त WDT मानधन रक्कम रु. १० कोटी वजा जाता उर्वरित रक्कम रु. १० कोटी म्हणजेच आत्मा संस्थेस वितरीत करावयाच्या निधीच्या ५% प्रमाणे प्रशासकीय निधी वितरीत करण्याबाबत चर्चा करण्यात आली. | | | |
| ९ | प्रधान मंत्री कृषी सिंचन योजना - पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत प्रेरक प्रवेश उपक्रम व उत्पादन पद्धती या घटकाच्या अंमलबजावणीसाठी संचालक, आत्मा, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी सादर केलेल्या "Drafts Terms of Reference (ToR) For Selection of Service Provider (SP) for providing Technical and | प्रधान मंत्री कृषी सिंचन योजना - पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत प्रेरक प्रवेश उपक्रम व उत्पादन पद्धती या घटकाच्या अंमलबजावणीसाठी संचालक, आत्मा, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी सादर केलेल्या "Drafts Terms of Reference (ToR) For Selection of Service Provider (SP) for providing Technical and Process Management support to १४० Farmer Producer Companies (FPCs) in Maharashtra under PMKSY-WDC २.० in Maharashtra" बाबत समितीस अवगत करून देण्यात आले. यामध्ये या योजने अंतर्गत प्रेरक प्रवेश उपक्रम व उत्पादन पद्धती या घटकांच्या अंमलबजावणीसाठी सेवा पुरवठादार संस्था नेमून त्याद्वारे प्रेरक प्रवेश उपक्रमांतर्गत जे शेतकरी | प्रधान मंत्री कृषी सिंचन योजना - पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत प्रेरक प्रवेश उपक्रम व उत्पादन पद्धती या घटकाच्या अंमलबजावणीसाठी संचालक, आत्मा, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी सादर केलेल्या "Drafts Terms of Reference (ToR) For Selection of Service Provider (SP) for providing Technical and Process Management support to १४० Farmer Producer Companies (FPCs) in Maharashtra under PMKSY-WDC २.० in Maharashtra" या मसुद्यास तत्वत: मान्यता देण्यात आली. तसेच प्रधान मंत्री कृषी सिंचन योजना - पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या सेवा पुरविणेकरिता सेवापुरवठादार म्हणून मे.एक्संट टेक सर्विसेस | वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा २.०, पुणे व आत्मा संस्था | |

| अ.क्र. | विषय | बैठकीतील चर्चा | बैठकीतील निर्णय | अंमलबजावणी यंत्रणा / अधिकारी | अंमलबजावणी पूर्ण करणेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| | Process Management support to १४० Farmer Producer Companies (FPCs) in Maharashtra under PMKSY-WDC २.० in Maharashtra" बाबत. | उत्पादक संघ/कंपनी स्थापन करावयाच्या आहेत त्यासाठी आणि उत्पादन पद्धती घटकांतर्गत शेतकरी उत्पादक संघ/कंपनी यांना त्यांचे Business Plan बनविणे, बँक लोनसाठी मदत करणे, Business Plan राबविण्यासाठी आवश्यक ती साहय्यता प्रदान करणे, क्षमता बांधणी इ. साठी तांत्रिक(Tecnical) आणि प्रक्रिया व्यवस्थापन (Processs Management) सहाय्य शेतकरी उत्पादक संघ/कंपनी यांना उपलब्ध करून देण्यात व त्यासाठी सेवा पुरवठादार नेमण्यासाठीच्या अटी व शर्ती (Terms of Reference) यांचा समावेश असल्याचे समितीस अवगत करण्यात आले. यामध्ये उद्दिष्टे, सेवापुरावठादार कडून अपेक्षित सेवाबाबत तसेच यातून अपेक्षित साध्य कालावधी, व्यावसायिक मार्गदर्शन करण्यासाठी तज्ञ व त्या अनुषंगाने नेमण्यात येणाऱ्या मनुष्यबळाच्या मानधन तरतूद इ. बाबींचा समावेश आहे. यासाठी रु.९,०९,२४,९००/- एवढ्या निधीची आवश्यकता असेल असे नमूद केले असल्याबाबत समिती सदस्यांच्या निदर्शनास आणून देण्यात आले.<br>प्रधान मंत्री कृषी सिंचन योजना - पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत उत्पादन पद्धती व प्रवेश प्रेरक उपक्रम या बाबीकरीता आत्मा संस्थेस | लि. या संस्थेस शासनस्तरावरुन नियुक्त करण्यात आलेल्या आहे. तसेच मसुद्यातील नमुद शैक्षणीक अर्हता, अनुभव व मानधन प्रधान मंत्री कृषी सिंचन योजना - पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत कार्यरत असलेल्या कंत्राटी मनुष्यबळाची शैक्षणीक अर्हता, अनुभव व मानधन हे भिन्न असल्याने याबाबत आत्मा संस्थेने त्यांचे स्तरावर निर्णय घ्यावा, असे निर्देश देण्यात आले.<br>तसेच प्रधान मंत्री कृषी सिंचन योजना - पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत उत्पादन पद्धती व प्रवेश प्रेरक उपक्रम या बाबीकरीता आत्मा संस्थेस वितरीत करवयाच्या निधीच्या ५% प्रशासकीय निधी वितरीत करण्यास मान्यता देण्यात आलेली असल्याने, सदर बाबीकरीता कोणताही अतिरिक्त प्रशासकीय निधी वितरीत करण्यात येणार नाही, असे निर्देश देण्यात आले. | | |

| अ.क्र. | विषय | बैठकीतील चर्चा | बैठकीतील निर्णय | अंमलबजावणी यंत्रणा / अधिकारी | अंमलबजावणी पूर्ण करणेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| | | वितरीत करावयाच्या निधीच्या ५% प्रशासकीय निधी अनुज्ञेय करण्याबाबत व WDT कृषि यांना आत्मा संस्थेस सहाय्य करणेबाबत चर्चा करण्यात आली. | | | |
| १० | प्रधान मंत्री कृषी सिंचन योजना - पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणा म्हणून काम करण्यासाठी निवडसूची तयार करण्यास्तव स्वयंसेवी संस्था /अशासकीय संस्था यांच्या प्राप्त प्रस्तावांची छाननी वाल्मी संस्थेमार्फत करण्याबाबत. | प्रधान मंत्री कृषी सिंचन योजना - पाणलोट विकास घटक २.० मधील समाविष्ट क्षेत्रातील क्षेत्रिय स्तर व गाव पातळीवरील विविध भागधारकांचे प्रशिक्षण पार पाडण्यासाठी या योजनेअंतर्गत प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणा (PIA), जिल्हा संसाधन संस्था (DRO), प्रकल्प प्रशिक्षण संस्था (PTO), उपजीविका संसाधन यंत्रणा (LRA), यासाठी स्वयंसेवी /शासकीय/बिगर शासकीय संस्थांची निवड सूची राज्य स्तरावर तयार करण्यासाठी जुलै २०२२ मध्ये मृद व जल संधारण विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या स्तरावरून जाहिरात देण्यात आली होती. त्यानुसार प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणा (PIA) म्हणून काम करण्यासाठी निवडसूची तयार करण्यास्तव स्वयंसेवी संस्था/अशासकीय संस्था यांच्याकडून एकूण ३१४ प्रस्ताव प्राप्त झाले आहेत.<br>जिल्हा संसाधन संस्था (DRO), प्रकल्प प्रशिक्षण संस्था (PTO), उपजीविका संसाधन यंत्रणा (LRA), यासाठी स्वयंसेवी/शासकीय/ बिगर शासकीय संस्थांची निवड सूची | जिल्हा संसाधन संस्था (DRO), प्रकल्प प्रशिक्षण संस्था (PTO), उपजीविका संसाधन यंत्रणा (LRA), यासाठी स्वयंसेवी/शासकीय/बिगर शासकीय संस्थांची निवड सूची राज्यस्तरावर तयार करण्यासाठी जाहिरातीद्वारे प्राप्त प्रस्तावांची छाननी योजनेत राज्य प्रशिक्षण संस्था म्हणून कार्यरत असलेल्या जल व भूमी व्यवस्थापन संस्था (वाल्मी) मार्फत राज्यस्तरीय नोडल यंत्रणेच्या निर्णयानुसार करण्यात आली आहे. त्याच प्रकारे जाहिरातीद्वारे प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणा (PIA) साठीचे जे ३१४ प्रस्ताव प्राप्त झाले आहेत त्यांची छाननीदेखील जल व भूमी व्यवस्थापन संस्था (वाल्मी) संस्थेमार्फत करण्यात यावी, असा निर्णय घेण्यात आला. | वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा २.०, पुणे व वाल्मी संस्था. | |

| अ.क्र. | विषय | बैठकीतील चर्चा | बैठकीतील निर्णय | अंमलबजावणी यंत्रणा / अधिकारी | अंमलबजावणी पूर्ण करणेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| | | राज्यस्तरावर तयार करण्यासाठी जाहिरातीद्वारे प्राप्त प्रस्तावांची छानंनी योजनेत राज्य प्रशिक्षण संस्था म्हणून कार्यरत असलेल्या जल व भूमी व्यवस्थापन संस्था (वाल्मी) मार्फत राज्यस्तरीय नोडल यंत्रणेच्या निर्णयानुसार करण्यात आली आहे. त्याच प्रकारे जाहिरातीद्वारे प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणा (PIA) साठीचे जे ३१४ प्रस्ताव प्राप्त झाले आहेत त्यांची छाननी वाल्मीमार्फत करण्याबाबत बैठकीत चर्चा करण्यात आली. | | | |
| ११ | प्रधान मंत्री कृषी सिंचन योजना - पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत प्रकल्प व्यवस्थापक तथा जिल्हा जलसंधारण अधिकारी आणि प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणा यांची -Centre of Excellence on Watershed Management, UAS, GKVK, Bangalore° येथील आंतरराज्यीय अभ्यास दौऱ्याबाबत. | वाल्मी संस्थेने "Centre of Excellence on Watershed Management, UAS, GKVK, Bangalore° येथे प्रकल्प व्यवस्थापक तथा जिल्हा जलसंधारण अधिकारी आणि प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणा यांचा अभ्यास दौरा आयोजित करण्याचे प्रस्तावित केले असून यासाठी क्षेत्रिय स्तरावरील प्रकल्प व्यवस्थापक तथा जिल्हा जल संधारण अधिकारी, प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणा, वसुंधरा कार्यालयाचे अधिकारी, वाल्मी संस्थेतील अधिकारी/प्राध्यापक असे एकूण ३० प्रशिक्षणार्थीचा या दौऱ्यात सहभाग असेल याबाबत समितीस माहिती देण्यात आली. या दौऱ्याचे सर्व नियोजन वाल्मी स्तरावरून करण्यात येणार असून अभ्यास दौऱ्याच्या आयोजनाबाबत वाल्मी संथेने उपरोक्त नमूद बेंगलोर येथील संस्थेशी संपर्क साधला | वाल्मी संस्थेने "Centre of Excellence on Watershed Management, UAS, GKVK, Bangalore° येथे प्रकल्प व्यवस्थापक तथा जिल्हा जलसंधारण अधिकारी आणि प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणा यांच्या प्रस्तावित केलेल्या अभ्यास दौऱ्यास समितीने मान्यता दिली. यासाठी क्षेत्रीय स्तरावरील प्रकल्प व्यवस्थापक तथा जिल्हा जलसंधारण अधिकारी, प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणा, वसुंधरा कार्यालयाचे अधिकारी, वाल्मी संस्थेतील अधिकारी/प्राध्यापक असे एकूण ३० प्रशिक्षणार्थीचा या दौऱ्यात सहभाग असेल व या दौऱ्याच्या आयोजनासाठी वाल्मी संस्थेने रु.३४००/- प्रतिदिन प्रति प्रशिक्षणार्थी प्रमाणे एकूण ३० प्रशिक्षणार्थीसाठी होणारा खर्च रु. ६.१२ लाख असेल असे वसुंधरा कार्यालयास कळविले | वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा २.०, पुणे व वाल्मी संस्था. | |

| अ.क्र. | विषय | बैठकीतील चर्चा | बैठकीतील निर्णय | अंमलबजावणी यंत्रणा / अधिकारी | अंमलबजावणी पूर्ण करणेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| | | असून या संस्थेने रु. ३४००/- प्रतिदिन प्रति प्रशिक्षणार्थी दर कळविला असून, त्यानुसार ५ दिवसीय निवासी प्रशिक्षणाचा ३० प्रशिक्षणार्थीसाठी येणारा खर्च रु. ६.१२ लाख एवढा असेल, असे वाल्मी संस्थेने वसुंधरा कार्यालयास पत्राद्वारे कळविले असल्याबाबत समितीस अवगत करण्यात आले. बेंगलोर येथील संस्थेमार्फत रु. ३४००/- प्रतिदिन प्रति प्रशिक्षणार्थी दर जो कळविला आहे त्यात प्रशिक्षणार्थीची निवास व्यवस्था, भोजन व्यवस्था, प्रशिक्षण, स्थानिक क्षेत्रिय भेट इ. चा खर्चाचा समावेश आहे. या अभ्यास दौऱ्यास व त्यासाठी वाल्मी संस्थेने अपेक्षित येणारा खर्च कळविला आहे त्याबाबत बैठकीत चर्चा करण्यात आली. याच प्रकारे इतर राज्यातही असे अभ्यास दौरे वाल्मी मार्फत आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती महासंचालक, वाल्मी यांनी समितीस दिली.<br>अध्यक्षांनी असे अभ्यास दौरे आयोजित करण्यात येऊन ज्या राज्यांमध्ये पाणलोट विकासाचे काम चांगल्या प्रकारे होत आहे अशा ठिकाणी महाराष्ट्रातील अधिकारी यांना नेऊन माहिती देण्यात यावी अशा सूचना दिल्या. तसेच वाल्मी संस्थेमार्फत या अनुषंगाने जे अभ्यास दौरे | आहे त्यास मान्यता दिली व हा खर्च वाल्मी संस्थेस क्षमता बांधणी घटकांतर्गत वर्ग करण्यात आलेल्या निधीतून करण्यात यावा, असे निर्देश समितीने दिले.<br>तसेच ज्या राज्यांमध्ये पाणलोट विकासाचे काम उत्तम प्रकारे होत आहे अशा ठिकाणी महाराष्ट्रातील अधिकारी यांना त्या कामांना भेटी देण्यासाठी वाल्मी संस्थेमार्फत आयोजित अभ्यास दौऱ्यांना समितीने मान्यता दिली. | | |

| अ.क्र. | विषय | बैठकीतील चर्चा | बैठकीतील निर्णय | अंमलबजावणी यंत्रणा / अधिकारी | अंमलबजावणी पूर्ण करणेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| | | आयोजित करण्यात येतील त्यांना मान्यता असेल अशी चर्चा बैठकीत झाली. | | | |
| १२ | प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना - पाणलोट विकास घटक २.० माहे एप्रिल २०२३ ते ऑगस्ट २०२३ या कालावधीत कार्यरत असलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या मानधनाबाबत. | प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत वसुंधरा पुणे कार्यालयातील कंत्राटी मनुष्यबळ, तसेच जिल्हा जलसंधारण अधिकारी, पुणे, लातूर व सोलापुर यांनी मागणी केलेल्या माहे एप्रिल २०२३ ते ऑगस्ट २०२३ या कालावधीत कार्यरत असलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मानधनाबाबत सविस्तर चर्चा झाली व सदर कालावधीत कोणत्याही सेवापुरवठादार संस्थेची नेमणूक झालेली नसल्याने मानधन अदा करण्यात आलेले नाही, असे समितीस अवगत करण्यात आले.<br>राज्यस्तरीय मान्यता समिती (SLSC) चे दि.१७.०१.२०२३ च्या बैठकीचे इतिवृत्तातील निर्देशानुसार वसुंधरा पुणे, जिल्हास्तर व प्रकल्प स्तरावरील कंत्राटी मनुष्यबळ दि. ३१.०३.२०२३ पर्यंत उपलब्ध करुन घेणेकरिता जिल्हा स्तरावर इतर योजनांसाठी शासनाच्या विहित कार्यपद्धतीचा अवलंब करुन, यापूर्वी नेमण्यात आलेल्या सेवा पुरवठादार संस्थेकडून योजनेसाठी आवश्यक असणारी जिल्हा तसेच प्रकल्प स्तरावरील मनुष्यबळ उपलब्ध करुन घेणे शक्य आहे किंवा कसे याबाबत पडताळणी करण्यात | राज्य स्तरीय मान्यता समिती (SLSC) चे दि.१७.०१.२०२३ च्या बैठकीचे इतिवृत्तातील निर्देशानुसार वसुंधरा पुणे, जिल्हास्तर व प्रकल्प स्तरावरील कंत्राटी मनुष्यबळ दि. ३१.०३.२०२३ पर्यंत उपलब्ध करुन घेणेकरिता जिल्हा स्तरावर इतर योजनांसाठी शासनाच्या विहित कार्यपद्धतीचा अवलंब करुन, यापूर्वी नेमण्यात आलेल्या सेवा पुरवठादार संस्थेकडून योजनेसाठी आवश्यक असणारी जिल्हा तसेच प्रकल्प स्तरावरील मनुष्यबळ उपलब्ध करुन घेणे शक्य आहे किंवा कसे याबाबत पडताळणी करण्यात यावी व त्याप्रमाणे मनुष्यबळ उपलब्ध करून घेण्यात यावे आशा सूचना उपसचिव मृद व जलसंधारण विभाग यांचे पत्र क्र. राकृयो-२०२२/प्र.क्र.३७/ जल-८, दि. २०.०१.२०२३ अन्वये देण्यात आलेल्या निर्देशानुसार नियुक्त सेवापुरवठादार संस्थेमार्फत माहे एप्रिल २०२३ ते ऑगस्ट २०२३ या कालावधीत कार्यरत असलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांचे प्रलंबित मानधन माहे मार्च २०२३ पर्यंत अदा केलेल्या दरानेच संबंधित कंत्राटी कर्मचारी / अधिकाऱ्यांच्या मागणीप्रमाणे अदा करण्याबाबत समितीने मान्यता दिली. | वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा पुणे व सर्व संबंधित जिल्हा जलसंधारण अधिकारी. | |

| अ.क्र. | विषय | बैठकीतील चर्चा | बैठकीतील निर्णय | अंमलबजावणी यंत्रणा / अधिकारी | अंमलबजावणी पूर्ण करणेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| | | यावी व त्याप्रमाणे मनुष्यबळ उपलब्ध करून घेण्यात यावे अशा सूचना उपसचिव मृद व जलसंधारण विभाग यांचे पत्र क्र. राकृयो-२०२२/प्र.क्र.३७/जल-८, दि. २०.०१.२०२३ अन्वये देण्यात आलेल्या होत्या. त्यानुसार काही जिल्ह्यांनी दि. ३१.०३.२०२३ पर्यंत कंत्राटी मनुष्यबळ उपलब्ध करून घेतले होते.<br>तदनंतर कुठल्याही सेवापुरवठादार संस्थेचे नियुक्ती आदेश या कार्यालयास प्राप्त नव्हते. तथापि दि. ३१.०३.२०२३ अखेर कार्यरत असलेल्या सेवापुरवठादार संस्थेकडून सदरचे प्रलंबित मानधन अदा करता येईल किंवा कसे याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. त्यानुसार प्रत्यक्ष काम केलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना त्यांनी केलेल्या कामाचा अहवाल जिल्हा जलसंधारण अधिकारी यांनी प्रमाणित केल्यावरच प्रलंबित मानधन अदायगीबाबत कार्यवाही करावी, असे निर्देश अध्यक्षांनी दिले. | तथापि सदरचे मानधन अदा करण्यापूर्वी प्रत्यक्ष काम केलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना त्यांनी केलेल्या कामाचा अहवाल जिल्हा जलसंधारण अधिकारी यांनी प्रमाणित करुन वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे या कार्यालयास सादर करावा व वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे या कार्यालयाने मान्यता दिल्यांवरच प्रलंबित मानधन अदायगीबाबत कार्यवाही करावी, असे निर्देश समितीने दिले. | | |
| १३ | प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना - पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत मंजूर आकृतीबंधानुसार कंत्राटी कर्मचाऱ्यांचे | उद्योग ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र संकिर्ण -२०१७/प्र.क्र.९३ /कामगार-८, दि.०६.०९.२०२३ व मृद व जलसंधारण विभाग पत्र क्र. राकृयो-२०२२/प्र.क्र.३७/जल८, दि. ०३.१०.२०२३ अन्वये कंत्राटी कर्मचाऱ्यांचे शासन निर्णयानुसार पदनाम व मानधन परिशिष्ट "क" | उद्योग ऊर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र. संकिर्ण-२०१७/प्र.क्र.९३/ कामगार-८, दि.०६.०९.२०२३ व मृद व जलसंधारण विभाग पत्र क्र.राकृयो-२०२२/प्र.क्र.३७/जल८, दि. ०३.१०.२०२३ अन्वये कंत्राटी कर्मचाऱ्यांचे निश्चित केलेले पदनाम व मानधन हे शासन दराप्रमाणे | वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा पुणे व सर्व संबंधित जिल्हा | |

| अ.क्र. | विषय | बैठकीतील चर्चा | बैठकीतील निर्णय | अंमलबजावणी यंत्रणा / अधिकारी | अंमलबजावणी पूर्ण करणेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| | पदनिहाय निश्चित केलेल्या मानधनास कार्योत्तर मान्यता देणेबाबत. | प्रमाणे निश्चित करण्यात आलेले आहे. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार सदरचा खर्च १०% प्रशासन निधीतून भागविण्यात येणार आहे. याबाबत समितीस अवगत करण्यात आले. | असल्याने परिशिष्ट "क" प्रमाणे मान्यता देण्यात आली. | जलसंधारण अधिकारी. | |
| १४ | प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना - पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत कार्यरत असलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना शासकीय कामकाजासाठी केलेल्या दौऱ्याकरिता प्रवासभत्ता व दैनिक भत्ता दर निश्चित करणेबाबत. | प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना - पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत कार्यरत असलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना शासकीय कामकाजासाठी केलेल्या दौऱ्याकरिता प्रवासभत्ता व दैनिक भत्ता दर शासन निर्णय क्र. प्रवास-१०१०/प्र.क्र.२/सेवा-५, दि.०३.०३.२०१० व शासन निर्णय क्र. प्रवास - २०२२/प्र.क्र. ०३/२०२२/सेवा ५, दि.०७.१०.२०२२ अन्वये शासकीय कर्मचाऱ्यांसाठी निश्चित केलेल्या दराप्रमाणे परिशिष्ट "क" नुसार समितीसमोर सादर करण्यात आले. अध्यक्षांना सदरचे दर हे इतर योजनेतील कंत्राटी कर्मचाऱ्यांना देय असलेल्या दैनिक भत्ता व प्रवास भत्ता दराशी पडताळणी करणेबाबत सूचित केले व जास्त तफावत नसल्यास सदरचे दर मान्य करणेबाबत सुचना दिल्या.<br>त्यानुसार इतर कार्यालयांशी संपर्क साधला असता, कंत्राटी कर्मचाऱ्यांना उपरोक्त शासनदरानुसार प्रवास भत्ता व दैनिक भत्ता देण्यात येत असल्याचे मौखीक सांगितले सबब | प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना - पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत कार्यरत असलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना शासकीय कामकाजासाठी केलेल्या दौऱ्याकरिता प्रवासभत्ता व दैनिक भत्ता दर शासन निर्णय क्र. प्रवास-१०१०/प्र.क्र.२/सेवा-५, दि.०३.०३.२०१० व शासन निर्णय क्र. प्रवास - २०२२/प्र.क्र. ०३/२०२२/सेवा ५, दि.०७.१०.२०२२ अन्वये शासकीय कर्मचाऱ्यांसाठी निश्चित केलेल्या दराप्रमाणे अध्यक्षांनी दिलेल्या निर्देशानुसार योग्य तो बदल करुन परिशिष्ट "ड" नुसार मान्यता देण्यात आली. | वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा पुणे व सर्व संबंधित जिल्हा जलसंधारण अधिकारी, प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणा. | |

| अ.क्र. | विषय | बैठकीतील चर्चा | बैठकीतील निर्णय | अंमलबजावणी यंत्रणा / अधिकारी | अंमलबजावणी पूर्ण करणेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| | | अध्यक्ष यांनी दिलेल्या सूचनांनुसार योग्य तो बदल करण्यात आला. | | | |
| १५ | प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना - पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत राज्य, जिल्हा, प्रकल्प स्तरावर करावयाच्या प्रशासकिय निधी वितरणाच्या सुधारित प्रमाणाबाबत. | राज्यस्तरीय नोडल यंत्रणेच्या दि.०१.०८.२०२३ च्या बैठकीमध्ये प्रशासकिय खर्च हा एकूण प्रकल्प खर्चाच्या १०% मर्यादित पुढीलप्रमाणे प्रत्यक्ष त्रैमासिक प्रकल्प खर्चाच्या आधारावर राज्यस्तरावर १%, जिल्हास्तरावर ०.५% प्रकल्प स्तरावर ५.५% व पाणलोट समिती स्तरावर ३% निधी वितरित करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.<br>तथापि राज्य, जिल्हा व प्रकल्प स्तरावरील कंत्राटी कर्मचाऱ्यांचे मानधन देयक मे. ॲक्सेंट टेक सर्व्हिसेस लि. या सेवापुरवठादार संस्थेस एकत्रितरित्या राज्यस्तरावरुन प्रदान करण्यात येत आहे. सदर बाबीकरिता अंदाजे मासिक १.८७ कोटी व वार्षिक २२.४० कोटी इतका निधी केवळ मानधन अदायगीकरिता आवश्यक आहे.<br>सबब प्रशासकिय निधी वितरित करण्याबाबत चर्चा करण्यात आली व अध्यक्ष यांनी प्रशासकीय खर्चाचा अंदाजित अराखडा तयार करणेबाबत सूचित केले. तसेच पाणलोट समितीस्तरावर वितरीत करावयाचा प्रशासकीय निधीबाबत बदल सुचविणेत आला. | प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना - पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत राज्य, जिल्हा, प्रकल्प स्तरावर करावयाच्या १० % प्रशासकिय निधी वितरणाच्या सुधारित प्रमाण खालीलप्रमाणे निश्चित करण्यास मान्यता देण्यात आली -<br>१) राज्य स्तरावर ६.७ %<br>२) जिल्हा स्तरावर ०.३ %<br>३) प्रकल्प स्तरावर ०.५ %<br>४) पाणलोट समिती स्तरावर २.५%<br>तसेच कार्यालयीन खर्चाकरिता विविध प्रकारच्या प्रशासकीय नोंदवही व इतर प्रशासकीय बाबींकरीता जिल्हा स्तरावर व प्रकल्प स्तरावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या मान्यतेने निधी वितरीत करण्याबाबत निर्देश देण्यात आले. | वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा पुणे व सर्व संबंधित जिल्हा जलसंधारण अधिकारी, प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणा | |

| अ.क्र. | विषय | बैठकीतील चर्चा | बैठकीतील निर्णय | अंमलबजावणी यंत्रणा / अधिकारी | अंमलबजावणी पूर्ण करणेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १६ | प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना - पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत शासकीय कामकाजासाठी केलेल्या दौऱ्यादरम्यान झालेल्या निवासी शुल्क व आदरातिथ्य शुल्क याची प्रतिपुर्तीबाबत. | प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना - पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत अध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी व राज्यस्तरावर कार्यरत असलेले अधिकारी यांना योजनेच्या विविध कामांकरिता महाराष्ट्रामध्ये किंवा महाराष्ट्राबाहेर दौरा करावा लागतो. तथापि बहुतांशी वेळा शासकीय विश्रामगृह उपलब्ध नसल्याने निवासाची व्यवस्था खाजगी हॉटेलमध्ये करावी लागते.<br>त्यामुळे IWMP १.० अंतर्गत राज्यस्तरीय नोडल यंत्रणेच्या १२ व्या बैठकीमधील विषय क्र. ४ अन्वये केंद्र शासनाच्या नियमानुसार निवास शुल्क व भोजन खर्च प्रतिपुर्ती देण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. तसेच केंद्र शासनाच्या अधिकाऱ्यांच्या दौऱ्यादरम्यानही शासकीय विश्रामगृह उपलब्ध न झाल्यास केंद्र शासनाच्या नियमानुसार निवास शुल्क व भोजन खर्च प्रतिपुर्ती देण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.<br>जेव्हा शासकीय विश्रामगृह उपलब्ध असतील अथवा संबंधितांनी स्वतःच निवास व्यवस्था केलेली असेल तर दैनिक भत्ता महाराष्ट्र शासन शासन निर्णय क्र. प्रवास - १०१०/प्र.क्र.२/सेवा ५, दि. ०३.०३.२०१० अन्वये लागू राहील, असाही | प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना - पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत कार्यरत शासकीय अधिकाऱ्यांना शासन निर्णय क्र. प्रवास - २०२२/ प्र.क्र.०३/२०२२/सेवा-५, दि. ०७.१०.२०२२ मधील नमूद अटी शर्तीनुसार दिल्ली, मुंबई, कोलकत्ता, चेन्नई, बंगळूर, हैद्राबाद या शहरातील हॉटेलमध्ये शासकीय कामकाजानिमित्त वास्तव्य केल्यास निवास शुल्क व भोजन खर्चाची प्रतिपुर्ती देण्यास व इतर शहरांकरिता केंद्र शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या नियमांनुसार निवास शुल्क व भोजन खर्चाची प्रतिपुर्ती देण्यास मान्यता देण्यात आली.<br>तथापि जेव्हा शासकीय विश्रामगृह उपलब्ध असतील अथवा संबंधितांनी स्वतःच निवास व्यवस्था केलेली असेल तर दैनिक भत्ता महाराष्ट्र शासन शासन निर्णय क्र. प्रवास - १०१०/प्र.क्र.२ /सेवा-५, दि. ०३.०३.२०१० अन्वये लागू राहील, | वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा २.०, पुणे | |

| अ.क्र. | विषय | बैठकीतील चर्चा | बैठकीतील निर्णय | अंमलबजावणी यंत्रणा / अधिकारी | अंमलबजावणी पूर्ण करणेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| | | निर्णय सदर बैठकीत घेण्यात आला. याबाबत समितीस अवगत करण्यात आले.<br>त्यानुसार प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना - पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत कार्यरत शासकीय अधिकाऱ्यांना शासन निर्णय क्र. प्रवास - २०२२/प्र.क्र.०३/२०२२/सेवा-५, दि.०७.१०.२०२२ मधील नमूद अटी शर्तीनुसार दिल्ली, मुंबई, कोलकत्ता, चेन्नई, बंगळूर, हैद्राबाद या शहरातील हॉटेलमध्ये शासकीय कामकाजानिमित्त वास्तव्य केल्यास निवास शुल्क व भोजन खर्चाची प्रतिपुर्ती देण्यास व इतर शहरांकरिता केंद्र शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या नियमांनुसार निवास शुल्क व भोजन खर्चाची प्रतिपुर्ती देण्याबाबत चर्चा करण्यात आली. | | | |
| १७ | प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना - पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत शासकीय कामकाजासाठी आयोजित बैठकीकरिता आदरातिथ्य शुल्क निश्चित करणेबाबत. | प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना - पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत योजनेच्या कामकाजासाठी आयोजित करण्यात येणाऱ्या विविध बैठकांकरिता चहापान, नाष्टा व्यवस्था करावी लागते. संपूर्ण दिवस बैठक घेण्यात आल्यास भोजन व्यवस्था करावी लागते. सदरचा खर्च भागविणेसाठी खालीलप्रमाणे दर निश्चित करणेबाबत चर्चा करण्यात आली - | प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना - पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत योजनेच्या कामकाजासाठी आयोजित करण्यात येणाऱ्या विविध बैठकांकरिता चहापान, नाष्टा व्यवस्था करावी लागते. संपूर्ण दिवस बैठक घेण्यात आल्यास भोजन व्यवस्था करावी लागते. सदरचा खर्च भागविणेसाठी खालीलप्रमाणे दर निश्चित करणेस मान्यता देण्यात आली - | वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा २.०, पुणे. | |

| अ.क्र. | विषय | बैठकीतील चर्चा | बैठकीतील निर्णय | अंमलबजावणी यंत्रणा / अधिकारी | अंमलबजावणी पूर्ण करणेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| | | अ. क्र. / खर्चाच्या बाबी / दर (रुपये) (प्रति व्यक्ती प्रति दिन)<br>१) चहा/कॉफी, जेवण (Working Lunch) — ३५०/-<br>२) चहा/कॉफी, नाष्टा — १२५/-<br>३) Special Lunch/Dinner — ७५०/- | अ. क्र. / खर्चाच्या बाबी / दर (रुपये) (प्रति व्यक्ती प्रति दिन)<br>१) चहा/कॉफी, जेवण (Working Lunch) — ३५०/-<br>२) चहा/कॉफी, नाष्टा — १२५/-<br>३) Special Lunch/Dinner — ७५०/- | | |
| १८ | प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना - पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत कंत्राटी पदाच्या आकृतिबंधाबाबत. | प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना - पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत राज्यस्तरीय नोडल यंत्रणेच्या दि.२०.०३.२०२३ व ३१.०५.२०२३ च्या बैठकीमध्ये कंत्राटी पदांचा आकृतिबंध मंजूर करण्यात आलेला आहे. सदर आकृतिबंधात वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे कार्यालयास ३ शिपाई व १ सफाईगार हे पद मंजूर आहे. सद्य:स्थितीत वसुंधरा, पुणे कार्यालयात १ शिपाई व १ सफाईगार कंत्राटी तत्वावर कार्यरत आहे व २ शिपाई संवर्गाची पदे रिक्त आहेत. तथापि, दि. ०६.०९.२०२३ च्या शासन निर्णयानुसार शिपाई पदासाठी १२ वी पास शैक्षणिक अर्हता केलेली असल्याने सदर शिपाई पदाकरिता अद्यापही कोणाचीही नियुक्ती सेवा पुरवठादार संस्थेमार्फत करण्यात आलेली नाही. वसुंधरा, पुणे कार्यालयाचे २ कक्ष मध्यवर्ती इमारत, | प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना - पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत कंत्राटी आकृतीबंधात खालीलप्रमाणे बदल करण्यास मान्यता देण्यात आली.<br>१) वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे कार्यालयास ३ शिपाई व १ सफाईगार या पदांऐवजी २ शिपाई व २ सफाईगार याप्रमाणे कंत्राटी तत्वावरील पदे घेण्यास मान्यता देण्यात आली.<br>२) जल व भूमी व्यवस्थापन संस्था (वाल्मी), छत्रपती संभाजीनगर यांना १ कृषितज्ञ ऐवजी १ डेटा एन्ट्री ऑपरेटर घेण्यास मान्यता देण्यात आली.<br>३) वसुंधरा पुणे कार्यालयातील श्री. नाईकनवरे स.ले.अ. यांना माहे मार्च २०२४ पर्यंत मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात आली. | वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा २.०, पुणे. | |

| अ.क्र. | विषय | बैठकीतील चर्चा | बैठकीतील निर्णय | अंमलबजावणी यंत्रणा / अधिकारी | अंमलबजावणी पूर्ण करणेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| | | पहिला मजला, पुणे येथे असून दोन्ही ठिकाणी पुरेशी स्वच्छता असणे आवश्यक आहे. सबब उर्वरित २ रिक्त शिपाई संवर्गाच्या पदाऐवजी १ शिपाई व १ सफाईगार कंत्राटी तत्वावर घेणेबाबत चर्चा करण्यात आली.<br>तसेच जल व भूमी व्यवस्थापन संस्था (वाल्मी), छत्रपती संभाजीनगर यांना मंजूर कंत्राटी पदांच्या आकृतिबंधात पुढीलप्रमाणे ३ पदे मंजूर करण्यात आलेली आहेत -<br>१) स्थापत्य अभियंता<br>२) कृषि तज्ञ<br>३) क्लर्क.<br>तथापि संबंधीत वाल्मी संस्थेने WDT (कृषि) या पदाऐवजी डाटा एंट्री ऑपरेटर हे कंत्राटी पद भरणेबाबत प्रस्ताव सादर केलेला आहे. वाल्मी संस्थेतील PMKSY प्रशिक्षण कक्षाची कामाची निकड लक्षात घेता महासंचालक, वाल्मी यांनी सादर केलेल्या प्रस्तावानुसार WDT (कृषि) या पदाऐवजी डाटा एंट्री ऑपरेटर या पदाचा समावेश करुन त्याप्रमाणे आकृतिबंधात बदल करणेबाबतचा प्रस्ताव सादर करण्यात आला.<br>वसुंधरा, पुणे कार्यालयातील श्री.नाईकनवरे स.ले.अ. यांना त्यांच्या वयोमानामुळे कंत्राटी पदावर माहे डिसेंबर, २०२३ पर्यंत मुदतवाढ | तथापि त्यांनी सदर कालावधीत त्यांचेकडील लेखाविषयक सर्व कामकाज इतर कार्यरत कंत्राटी कर्मचाऱ्यांना अवगत करुन हस्तांतरित करावे. | | |

| अ.क्र. | विषय | बैठकीतील चर्चा | बैठकीतील निर्णय | अंमलबजावणी यंत्रणा / अधिकारी | अंमलबजावणी पूर्ण करणेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| | | देण्यात आलेली होती, तथापि त्यांच्या मुलीच्या गंभीर आजारपणामुळे दि. २०.११.२०२३ ते २२.१२.२०२३ या कालावधीत गैरहजर होते. तोपर्यंत या कार्यालयात लेखा विभागात कंत्राटी कर्मचारी नियुक्त झालेले नव्हते. सद्य:स्थितीत लेखा विभागात माहे ०१.१२.२०२३ पासून PFMS Expert या पदावर नवीन कंत्राटी कर्मचारी रुजू झालेले आहेत. तथापि या कार्यालयातील कंत्राटी पदावर नव्याने येणाऱ्या कर्मचाऱ्यांना लेखाविषयक कामकाज व्यवस्थित समजावून सांगण्याकरिता श्री. नाईकनवरे हे उपरोक्त कालावधीत गैरहजर असल्याने व योजनेच्या कामाचा व्याप पाहता श्री.नाईकनवरे यांना माहे मार्च, २०२४ पर्यंत मुदतवाढ देणेबाबत प्रस्ताव सादर करण्यात आला. | | | |
| १९ | मा. अध्यक्ष यांच्या मान्यतेने आयत्या वेळेचे विषय.<br>१) प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना - पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत spineless cactus plantation विषयी | १) अध्यक्ष यांच्या परवानगीने ऐनवेळच्या विषयांमध्ये अपर मुख्य कार्यकारी अधिकारी, वसुंधरा यांनी महाराष्ट्र राज्याच्या दृष्टिकोनातून spineless cactus plantation विषयी खालीलप्रमाणे सादरीकरण केले. | वरीलप्रमाणे सादर केलेल्या cactus plantation च्या प्रस्तावास (परिशिष्ट "इ") राज्यस्तरीय नोडल यंत्रणेच्या सर्व सदस्यांनी मान्यता दिली. तसेच मा. अध्यक्ष यांच्या सूचनेनुसार सदर प्रस्ताव राज्यस्तरीय मान्यता समितीच्या मान्यतेसाठी सादर करण्यास मान्यता देण्यात आली. तसेच | वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा २.०, पुणे व वाल्मी संस्था | |

| अ.क्र. | विषय | बैठकीतील चर्चा | बैठकीतील निर्णय | अंमलबजावणी यंत्रणा / अधिकारी | अंमलबजावणी पूर्ण करणेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| | महाराष्ट्र राज्याच्या दृष्टिकोनातून तयार केलेल्या प्रस्तावाला मान्यता प्रदान करून त्यास राज्यस्तरीय मान्यता समितीच्या (SLSC) मान्यतेस्तव सादर करण्यास मान्यता देणे व वाल्मी, औरंगाबाद येथे १ acre ची nursery तयार करण्यास मान्यता देणे. | १. प्रस्तावित जिल्ह्यांची नावे - सातारा, अहमदनगर, सोलापूर, नंदुरबार, छत्रपती संभाजीनगर, बीड, धाराशीव, नांदेड, बुलढाणा, यवतमाळ.<br>२. प्रस्तावित रोपवाटिका (०.१० हे. प्रत्येकी) - ५००<br>३. एकूण प्रस्तावित लागवडीखालील क्षेत्र -५०० हे.<br>४. प्रस्तवित खाजगी जमिनीखालील क्षेत्र - ५०० हे.<br>५. प्रस्तावित शासकीय जमिनीखालील क्षेत्र- निरंक<br>६. प्रस्तावित बायोगॅस प्रकल्पांची संख्या - १५<br>७. बायोगॅस प्रकल्पांसाठी आवश्यक निधी (रू.७५०००/-प्रत्येकी) (रू. लाखात)- ११.२५<br>८. संभाव्य एकूण अंदाजपत्रक (रू. लाखात) - १४६१.२५<br>९. स्थानिक बाजारातून बीजाची उपलब्धता - अंशत: (BAIF)<br>११. लागवड करण्याकरिता लागणारा कालावधी - ६ महिने<br>Spineless Catus च्या वाढीसाठीचे धोरण<br>• SLNA, ATMA आणि BAIF यांच्यामध्ये त्रिस्तरीय करार | वाल्मी, औरंगाबाद येथे १ एकर ची रोपवाटिका व वनस्पती वाटिका तयार करण्यास मान्यता देणेत आली. याप्रमाणे प्रस्तावाच्या क्षेत्रात वाढ करुन एकूण खर्च रु.१४६२.८५/- लाख करण्यास मान्यता देण्यात आली. | | |

| अ.क्र. | विषय | बैठकीतील चर्चा | बैठकीतील निर्णय | अंमलबजावणी यंत्रणा / अधिकारी | अंमलबजावणी पूर्ण करणेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| | | • BAIF ने मास्टर ट्रेनरचे प्रशिक्षण घेणे, लागवड साहित्य उपलब्ध करून देणे, वाचन साहित्य आणि आवश्यक तांत्रिक मदत उपलब्ध करून देणे.<br>• वाल्मी येथे BAIF च्या माध्यमातून क्षमता वृद्धी करणे.<br>• सदरचा कार्यक्रम ३ टप्प्यात राबविण्यात येणार आहे.<br>**१ ला टप्पा-रोपवाटिकांची निर्मिती करणे**<br>• एकूण निर्माण होणाऱ्या रोपवाटिकांची संख्या - ५००<br>• १ रोपवाटिका व वनस्पतीवाटीकांची वाल्मी येथे निर्मिती<br>• विविध ठिकाणी शेतकऱ्यांच्या शेतावर ४९९ रोपवाटीकांची निर्मिती<br>• प्रत्येक रोपवाटिका व वनस्पतीवाटिका यांचे क्षेत्र - ०.१० हे.<br>• एक रोपवाटिका निर्मितीचा खर्च -रू. ४००००/-<br>• एकूण ५०० रोपवाटिका निर्मितीसाठी लागणारा निधी -रू.२०० लाख<br>**२ रा टप्पा-प्रात्यक्षिकाच्या माध्यमातून क्षेत्रात वाढ**<br>• एकूण प्रात्यक्षिकांची संख्या (०.१० हे. प्रत्येकी)- ५०००<br>• प्रात्यक्षिकाद्वारे पूर्ण होणारे क्षेत्र - ५०० हे. | | | |

| अ.क्र. | विषय | बैठकीतील चर्चा | बैठकीतील निर्णय | अंमलबजावणी यंत्रणा / अधिकारी | अंमलबजावणी पूर्ण करणेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| | | • १ हे. लागवडीसाठी येणारा खर्च (रू. लाखात)- २.५०<br>• एकूण ५००० प्रात्यक्षिकासाठी लागणारा निधी (रू. लाखात )- १२५०<br>**३ रा टप्पा -बायोगॅस प्रकल्पांची उभारणी**<br>• बायोगॅस प्रकल्पांची उभारणी -१५<br>• बायोगॅस प्रकल्पांचा BAIF च्या मदतीने विकास, प्रत्येक बायोगॅस प्रकल्पाचे मूल्य - रू.७५०००/-<br>• एकूण १५ बायोगॅस प्रकल्पांच्या उभारणीसाठी येणारा खर्च (रू. लाखात -११.२५)<br>**एकूण प्रकल्प किंमत (रू. लाखात )**<br>• ५०० रोपवाटिका निर्मितीसाठी येणारा खर्च - २००.००<br>• ५००० प्रात्यक्षिकाद्वारे क्षेत्र विस्तारासाठी येणारा खर्च -१२५०.००<br>• बायोगॅस प्रकल्पांच्या उभारणीसाठी येणारा खर्च (संख्या १५)- ११.२५<br>• एकूण किंमत -१४६१.२५ | | | |
| | २) प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना - पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत WDT या कंत्राटी | प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना - पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत प्रति प्रकल्प ३ पाणलोट विकास पथकातील सदस्य (WDT) याप्रमाणे १४४ प्रकल्पांसाठी ४३२ पाणलोट विकास पथकातील सदस्य (WDT) ची कंत्राटी पदे मंजूर करण्यात आलेली आहेत. त्यापैकी १४४ पदे पाणलोट | प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना - पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत कार्यरत पाणलोट विकास पथकातील सदस्य (WDT) यांना खालीलप्रमाणे कामकाज सोपविण्यास मान्यता देण्यात आली -<br>१) **पाणलोट विकास पथकातील सदस्य (WDT) कृषी** - फळबाग लागवड व कृषी विषयक सर्व | वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा पुणे व सर्व संबंधित जिल्हा जलसंधारण | |

| अ.क्र. | विषय | बैठकीतील चर्चा | बैठकीतील निर्णय | अंमलबजावणी यंत्रणा / अधिकारी | अंमलबजावणी पूर्ण करणेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| | पदाच्या कामकाजाबाबत. | विकास पथकातील सदस्य (WDT) कृषी, १४४ पदे पाणलोट विकास पथकातील सदस्य (WDT) समूह संघटक, १४४ पदे WDT सिव्हिल याप्रमाणे कंत्राटी पदे मंजूर आहेत. सदर पदांवरील कार्यरत कंत्राटी कर्मचाऱ्यांनी करावयाच्या कामकाजाबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. | कामकाज, MIS बाबतचे सर्व कामकाज, आत्मा संस्थेस वितरीत केलेल्या निधीस अनुसरुन उत्पादन पद्धती, प्रवेश प्रेरक उपक्रम विषयक सर्व कामकाज तसेच वरिष्ठांनी वेळोवेळी दिलेल्या सुचनांप्रमाणे सर्व कामकाज करावे.<br>२) **पाणलोट विकास पथकातील सदस्य (WDT) समुह संघटक** - उपजीविका या घटकांविषयीचे सर्व कामकाज तसेच वरिष्ठांनी वेळोवेळी दिलेल्या सूचनांप्रमाणे सर्व कामकाज करावे.<br>३) **पाणलोट विकास पथकातील सदस्य (WDT) सिव्हील** - नैसर्गिक संसाधन (NRM) विषयक सर्व कामकाज व MIS बाबत सहाय्य करणे तसेच प्रकल्प स्तरावर आवश्यकतेनुसार सहाय्य करणे व वरिष्ठांनी वेळोवेळी दिलेल्या सुचनांप्रमाणे सर्व कामकाज करावे. | अधिकारी प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणा | |
| | ३) प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना - पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत राज्य, जिल्हा व प्रकल्प स्तरावर संगणक व | प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना - पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत MIS, Baseline Survey व इतर शासकीय कामकाज करताना संगणक व प्रिंटर उपलब्ध नसल्याने तांत्रिक अडचणी येत असलेबाबत जिल्हा व प्रकल्प स्तरावरुन वारंवार सांगण्यात येत आहे. तसेच वसुंधरा, पुणे | प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना - पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत MIS, Baseline Survey व इतर शासकीय कामकाज करणेकरिता जिल्हा व प्रकल्प स्तरावर प्रत्येकी एक संगणक व प्रिंटर उपलब्ध करुन देण्यास मान्यता देण्यात आली. | वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा पुणे व सर्व संबंधित जिल्हा जलसंधारण | |

| अ.क्र. | विषय | बैठकीतील चर्चा | बैठकीतील निर्णय | अंमलबजावणी यंत्रणा / अधिकारी | अंमलबजावणी पूर्ण करणेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| | प्रिंटर उपलब्ध करुन देण्याबाबत. | कार्यालयातील संगणकही नादुरुस्त व निर्लेखन योग्य झाले असल्याने योजनेस गती येण्याच्या दृष्टीने राज्य, जिल्हा व प्रकल्प स्तरावर संगणक व प्रिंटर उपलब्ध करुन देण्याबाबत चर्चा करण्यात आली. | तसेच वसुंधरा पुणे कार्यालयाकरिताही आवश्यकतेनुसार संगणक व प्रिंटर उपलब्ध करुन देण्यास मान्यता देण्यात आली. तथापि जिल्हा व प्रकल्प स्तरावर संगणक खरेदी करताना NIC संस्थेने निश्चित केलेल्या Specification नुसार खरेदी करण्याबाबत व याकरीता येणारा खर्च हा प्रशासकीय निधीतून भागविण्याबाबत निर्देश देण्यात आले. | अधिकारी. प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणा | |

वरील प्रमाणे सर्व संबंधितांनी तात्काळ कार्यवाही करावी. उपस्थितांचे आभार मानून बैठक संपन्न झाली.

(वि.बा. नाथ)
सदस्य सचिव, राज्यस्तरीय नोडल यंत्रणा तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी
वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे

(सुनील चव्हाण, भाप्रसे)
अध्यक्ष, राज्यस्तरीय नोडल यंत्रणा तथा
सचिव, मृद व जलसंधारण,
महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई